# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २०/०५/२०२३

➢ वाहन चोरी    :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | , पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र ३६०/२०२३ कलम ३७९ भादवी | अमरावती | दि.१९/०५/२०२३ चे रात्री ०३.३० वा. ते ०४.०० वा<br><br>दा ता वेळ दि.१९/०५/२०२३ चे २१.३६ वा | एक महिला | १.दिपक उर्फ अंधी प्रल्हादराव शेन्डें वय अंदाजे ४० वर्ष, २. एक महिला ३. सचिन शामराव वानखडे वय अंदाजे ३४ वर्ष सर्व रा.फ्रेजरपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी चा मुलगा शाळा शिकत असुन त्याला शाळेत येण्या-जाण्यासाठी HERCULES ROADO NFS- २४ T Muntain कंपनीची निळया रंगाची गेअर असलेली सायकल तिन वर्षापुर्वी विकत घेतली होती. माझा मुलगा वरिल नमुद सायकल नेहमी घरासमोर उभी ठेवतो. आज दि.१९/०५/२०२३ रोजी मुलाने त्याची वरिल वर्णनाची सायकल नेहमी प्रमाणे घराचे समोर दारासमोर उभी ठेवली होती. तेव्हा रात्री ०३.३० वा ते ०४.०० वा दरम्यान माझे घरासमोरुन दिपक उर्फ प्रल्हादराव शेन्डें वय अंदाजे ४० वर्ष, २. एक महिला ३. सचिन शामराव वानखडे वय अंदाजे ३४ वर्ष सर्व रा.फ्रेजरपुरा अमरावती यांनी माझा मुलगा याची वापरती जुनी सायकल HERCULES ROADO NFS- २४ T Muntain कंपनीची निळया रंगाची गेअर असलेली कि.अ.१२,०००/- रु वरिल तिघांनी चोरुन नेली आहे. त्यांचेवर कार्यवाही व्हावी करिता रिपोर्ट देत आहे. हाच माझा जबानी रिपोर्ट आहे   वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात (फसवणुक) :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र ३५९/२०२३ कलम ४२०,३४ भादवि | इंद्रशेष मंदीर जवळ वडाळी अमरावती | दि. ०२/०५/२०२२ चे ११.०० वा ते दि.०९/०६/२०२२ चे ११.०० वा दरम्याण<br><br>दा ता वेळ दि.१९/०५/२०२३ चे १६.५७ वा. | नामदेव सुर्यभान शेकोकार वय६९ वर्ष रा. इंद्रशेष मंदीर जवळ वडाळी अमरावती | १. सुधीर वानखडे रा. गनोजादेवी<br>२. एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे कि फिर्यादी च्या घरी आरोपीचा मुलगा हा शिक्षणासाठी माहे एप्रिल २०२२ च्या माहे जुन २०२२ च्या कालावधी मध्ये राहत होता त्या दरम्यान फिर्यादीची व आरोपीची ओळख झाली त्या दरम्यान आरोपीने सागितले मी जिल्हा सामान्य रुग्नालय अकोला येथे आरोग्य सेवक पदावर नोकरी करतो माझे आरोग्य विभागातील मोठ-मोठया अधीका-यासोबत ओळख आहे चागले सबंध आहे तुमच्या मुलाचे नोकरी विषयी काम असेल तर सांगा असे म्हणाले मी माझा मुलगा अविनाशला नोकरी नाही असे सागितले होते मला काही दिवसा नंतर सुधीर वानखडे यांनी सागितले कि, अकोला येथे कोवीड योध्दा आणि लीपीक पदाची जागा आहे त्या पैकी एका जागेवर अविनाशची नियुक्ती करुन घेवु त्यासाठी तुम्ही १,००,०००/- रु व अविनाशचे कागदपत्र तयार ठेवा. दि.०२/०५/२०२२ रोजी ११.०० वा सुमारास सुधीर वानखडे आला व माझ्या घरी दिलीप लक्ष्मण बाभुळकर आणि सचिन जगनात निभोळकर असे बसले होते म्हणुन आरोपीने फियादीला बाजूला बोलावले तुम्ही लवकर पैसे दया आणि मी सागितले प्रमाणे कागदपत्र दया दिलीप बाभुळकर यांच्याकडुन घेतलेले रोख ७६०००/- रु व माझ्या जवळील नातेवाईकाचे आधारकार्ड व पॅन कार्ड मागितले प्रमाणे दिले. दि.०६/०५/२०२२ रोजी ११.०० वा दरम्यान सुधीर वानखडे आला व म्हणाला बाकी रक्कम दया व अविनाश कागदपत्र तयार करायचे आहे माझ्याकडे रोख नसल्यामुळे मी फोन-पें वरुन ६०००/- दिले. त्यानंतर दि. १२/०५/२०२२ रोजी ३०००/- रोजी आणि दि.०७/०५/२०२२ रोजी १५०००/- रु फोन पे नी दिले दि.०९/०६/२०२० रोजी सकाळी ११.०० वा दरम्यान सुधीर वानखडे आला व म्हणाला कि प्रतीज्ञा लेख तयार करायची आहे अविनाश माझा सोबत पाठवा स्टेप घ्यावा लागते अविनाश ला सुधीर वानखडे सोबत स्टॅप पेपर घ्यायला पाठवले माझा मुलाने सागितले कि १००/- दोन स्टॅप पेपर जयंत देशमुख कडुन घेतले व माझा को-या स्टॅप पेपर वर सहया घेतल्या दोन स्टॉप पेपरचे क्र २९०५२७ व २९०५२८ असे होते सुधीर वानखडे माझा मुलाला नोकरी लावु शकत नाही असे वाटल्याने मी त्यांना वारंवार फोन करत होतो सुधीर वानखडे फोन उचलत नव्हते म्हणुन मी दि.२२/१२/२०२२ रोजी सुधीर वानखडे यांचे मुळ गावी गनोजादेवी त्याच्या घरी गेलो असता सुधीर वानखडे होते मी त्यांना म्हटले कि घेतलेले पैसे कधी परत करता असे म्हटल्यावर त्यांनी मला शिवीगाळ केली व लोटलाट केली व म्हटले कि आम्ही पैसे घेतल्याचे लेखी आहे का कशाचे पैसे मी तुम्हाला ओडखत नाही मोबाईल मधील स्टॅप पेपर दाखवला व म्हाणला कि तुमचे पैसे व्याजासह परत केले आहेत उलट आमचेच पैसे तुमचे वर आहे पुन्हा याल तर फसवीण अशी धमकी दिली सुधीर वानखडे आणि त्याचे नातेवाईक यांनी माझा मुलाला नोकरी लावुन देतो म्हणुन नगदी ७६०००/- रु व फोन पे वरुन २४०००/- रु घेवुन माझी १,००,०००/- फसवणुक केली आहे अशा फियादीच्या जबानी रिपोर्ट वरुन गुन्हा दाखल |

➢ प्राणांतिक अपघात :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पोस्टे नांदगावपेठ अप क्र १८५/२३ कलम २७९,३३७ ,३०४(अ) भादवी | अमरावती | दि १३/०५/२३ चे २२/०० वा<br><br>दि १९/०५/२३ चे १७/०० वा<br><br>दि १९/०५/२३ चे १८/२१ वा | एक महिला | कार क्र एम.एच.०२ सि.एल.४७१२ चा चालक | मी समक्ष पोलीस स्टशनला येवुन जबानी रिपाट देते कि दि.१३/०५/२०२३ रोजी माझे पती हे नांदगाव पेठ येथील कापड मार्कट ड्रिमलड येथे सक्युरीटी गार्ड म्हणुन आज पासुनच कामावर जात असल्यान ते रात्राला १०/०० वा. दरम्यान पायदळ घरुण निघाले असता रोडने जात असतांना त्याना अचानक दुचाका क्रमाक MH-२७-DK-१६६७ स्प्लडर च्या अनोळखी मालकाला नांदगाव पेठ स्टड येथे विनता केली असता त्यान माझे पतीला ड्रामलड येथे पोहचुन दण्याकारता मागे बसवुन घेवुन जात असतांना नागपुर ते अमरावती राडवराल असलेले हॉटेल रेवा समोर नागपुर कडुन यणाऱ्या कार क्रमाक MH-०२-CL-४७१२ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाणे चालवुन माझे पती बसल्या असलल्या मोटर सायकलला मागुन जबर धडक दिला. त्यामुळ माझे पती व मोटर सायकल चालक हे दोघहा रोडवर गाडावरुन खाली पडले त्यामुळ माझ्या पतीला डाक्याला गंभीर मार लागुन जखमी झाले व मोटर सायकल चालकास डाक्याला मागुन पाठावर खरचटुन जखमी झाला. माझ्या पतीचा अपघात झाल्यान त्याना उपचारा कराता इर्वन दवाखाना येथे घेवुन गेलो असता आम्हा नातेवाईकांनी तेथुन लगेच सावदेकर हास्पाटल येथे गेलो त्यानतर माझ्या पतीची तब्यत जास्तच सिरियस असल्यान डॉ. सावदेकर यांनी नागपुर येथे उपचारा कराता घेवुन जाण्याच सागातल्या वरुन आम्हा नातेवाईकांनी लगेच रात्रा ०१/३० वा. दरम्यान नागपुर मडाकल कॉलेज येथे पुढाल उपचारा कराता घेवुन गेलो व त्या ठिकाणी भर्ता केले असता माझे पती उपचारा दरम्यान दि.१५/०५/२०२३ रोजी दुपारा ०४/३० वा. दरम्यान मरण पावले. माझया पतिच्या अपघातास वाहन क्र. एमएच—०२सीएल ४७१२ चा चालक जबाबदार आहे. करिता मी त्या वाहण चालकावर कार्यवाही होणेकरिता मी पोलीस स्टेशनला येवून जबानी रिपोर्ट देत आहे. माझा जबानी रिपोर्ट माझया सांगणे प्रमाणे लिहला वाचुन पाहिला बरोबर लिहला आहे. अशा फिर्यादी यांचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ जुगार रेड :-

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | बडनेरा | अप.क्र.३६४ /२३ कलम १२(अ) मजूका | बसस्थानक समोरील चौक ग्राम अंजनगाव बारी | दि. १९/०५/२०२३ चे १८:४० वा. ते १९:३० वा. दरम्यान | दि. १९/०५/२०२३ चे २०:०० वा. | सरतर्फे पोउपनि तुषार गावंडे, पोस्टे बडनेरा, अमरावती शहर | १) राहुल दादाराव वरठे, वय ४५ वर्षे, २) राजू शंकराव शेवतकर, वय ५७ वर्षे, दोन्ही रा. अंजनगाव बारी, ता.जि. अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १) वरली मटका जुगाराचे १ ते १० आकडे लिहलेली वही किं.अं. १०/-रुपये २) वरली मटका जुगाराचे नगदी १,३२०/- रुपये ३) वरली मटका जुगाराचे आकडे लिहीण्याकरीता वापरलेल्या निळ्या शाईचा बॉल पेन किं.अं. ५/-रुपये असा एकुण १,३३५/-रुपये चा वरली मटका जुगाराचा मुदद्माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | वलगाव | १६२/२०२३ कलम १२ (अ) म. जु. का प्रमाने दाखल. | आठवडी बाजार ग्राम खारतळेंगाव | दि.१९/०५/२०२३ चे १८/४५ वा. माहीती दि १९/०५/२०२३ चे १८/४५ वा. . | दि.१९/०५/२०२३ चे २१/५३ वा. | पोहेका निवासराव घुगे बं नंबर ७०६ पो. स्टे. वलगांव पोलीस स्टेशन वलगांव अमरावती शहर | १) अशोक रुपराव जुंमळे वय ५८ वर्ष (फरार) २) निवृत्ती दिलीप बुध वय २६ वर्ष ३) श्रवण पांडुरंग येरोने वय २५ वर्ष ४) मंगश शंकरराव भैसने वय ४० वर्ष सर्व रा. खारतळेंगाव ५) किशोर लक्ष्मणराव पुनसे वय ३८ वर्ष रा. वंडली ता. भातकुली जि. अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि. यातील फिर्यादी यांची पो. स्टे. ला ०९/०० वा ते २१/०० वा पावेतो डिओ ड्युटी असतांना गुप्तबातमीदारा कडुन माहीती मिळाली की ग्राम खारतळेंगाव आठवडी बाजार येथे एक ईसम ०१ ते १० आकडे चिठ्ठ्या देवुन वरली मटक्याच्या जुगार खेळ खेळवीत असल्याची गुप्त बातमी मीळाली अशा माहीती वरुन तपास पथक ASI ७६४ असे पंचा सह पो. स्टाँप असे लपत छपत आठवडी बाजार खारतळेंगाव येथे गेलो असता तेथ फरार आरोपी नामे अशोक रुपराव जुंमळे वय ५८ वर्ष हा लोकांन कडुन पैसे घेवुन त्यांना वरली मटक्या्या कागदी चिठ्ठ्या देवुन पैशाची पैज लावुन वरली मटक्याचा जुगार लोकांना खेळवितांना दिसुन आला त्याला पोलीसांची चाहुल लागतांच तो वरली मटक्याचे साहीत्या तेथेच टाकुन पळुन गेला पो. स्टाँप च्या मदतीने आरोपी क्र. २ ते ५ यांच्यावर जुगार रेड करुन पंचा समक्ष ताब्यात घेतले त्यांना त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव १) निवृत्ती दिलीप बुध वय २६ वर्ष २) श्रवण पांडुरंग येरोने वय २५ वर्ष ३) मंगश शंकरराव भैसने वय ४० वर्ष सर्व रा. खारतळेंगाव ३) किशोर लक्ष्मणराव पुनसे वय ३८ वर्ष रा. वंडली ता. भातकुली जि. अमरावती असे सांगीतले वरुन पंचा समक्ष आरोपीची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातुन ०१ ते १० आकडे लिहलेल्या वरली मटक्या आकड्याच्या कागदी चिठ्ठ्या व नगदी ३५००/- रु असा एकुण ३५००/-रु चा माल मिळुन आला सदर आरोपीतांचे कृत्य कलम कलम १२ (अ) म. जु. का प्रमाने होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | राजापेठ अमरावती शहर | अप क्र ४६८/२०२३ कलम ६५(ई) म.दा.का. | अमरावती | दि. १९.०५.२०२३ चे १८.३० वा. ते १९.३० वा. दरम्यान | दि. १९.०५.२०२३ रोजीचे २१.४१ वा. | पोहवा/१५२० मनिष करपे, पो स्टे राजापेठ अमरावती शहर | एक महिला | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी आजरोजी पो स्टे ला लेखी तक्रार दिली की, आज दिनांक १९.०५.२०२३ रोजीचे १८.३० वा. दरम्यान आम्ही सोबत पोना/५५६,६३८ पोशि/१५६७ मपोना/०९ असे पो स्टै हददीत करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहिती मिळाली की, एक महिला ही अवैधरित्या विनापरवाना देशी दारुची विक्री करीत आहे. अशा माहिती वरुन घटनास्थळ जप्ती पंचनामा मधील नमुद दोन पंचांसह व पोस्टाफसह गेलो असता आम्हाला दुरुनच एक महिला प्लास्टीक पिशवीमध्ये ठेवलेल्या दारुची विक्री करीत असतांना दिसल्याने आम्ही नमुद महिलेस सोबतच्या पंचांना निदर्शनास आुण त्याचे जवळ लपत छपत जावुन पो स्टाफच्या मदतीने तीला ताब्यात घेतले व नमुद महिलेस आमचा परिचद देवुन त्याचे जवळील प्लास्टीक पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये १५ नग देशी दारुच्या ९० मिलीच्या बॉबी संत्रा पावटया प्रत्येकी ३५ रुपये असे किं अं ५२५/- रु व एक प्लास्टीक पिशवी कि अं १०/- रु असा एकुण ५३५/- रु चा मुददेमाल मिळुन आला. नमुद महिलेस देशी दारु जवळ बाळगुन विक्री करणे करबाबत परवाना विचारला असता तिने जवळ कोणताही शासकीय परवाना नसल्याचे सांगितले. वरुन नमुद महिला ही अवैधरित्या दारु विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद महिला हीचे कृत्य कलम ६५(ई) म.दा.का. प्रमाणे होत असल्याने तिचे विरुध्द गुन्हा नोंद होणे कामी माझी कायदेशीर फिर्याद आहे. अशा फिर्यादीचे लेखी तक्रारी वरुन सदरचा गुन्हा दाखल |